महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ 9606 /२०२३ दि. 26/१०/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका, ठाणे कार्यक्षेत्रातील कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत पातलीपाडा येथे पातलीपाडा ब्रिज कडून आयुक्त बंगला सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर ठाणे महानगरपालिकेकडून रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट कडून पातलीपाडा ब्रिज कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ऋतू टॉवर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** पातलीपाडा, हिरानंदानी इस्टेट कडून मानपाडा ठाणेचे दिशेने जाणारी वाहने ऋतू टॉवर कट येथून डावे वळण घेवून ब्रम्हांड सर्कल, ब्रम्हांड सिग्नल, मानपाडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** हिरानंदानी इस्टेट कडून मिरा भाईदर, घोडबंदर चे दिशेने जाणारी वाहने आर्केडिया सर्कल, नारायण मढवी चौक, चुल्हा व्हिलेज हॉटेल, वाघबीळ ब्रिज खालून इच्छित स्थळी जातील.

**क)** हिरानंदानी इस्टेट कडून मिरा भाईदर, घोडबंदर चे दिशेने जाणारी वाहने आर्केडिया सर्कल, नारायण मढवी चौक, चुल्हा व्हिलेज हॉटेल, निलम हॉटेल येथून उजवे वळण घेवून आनंदनगर बस डेपो, आनंदनगर सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि.२६ /१०/२०२३ रोजी पासून पातलीपाडा ब्रिज कडून आयुक्त बंगला सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर ठाणे महानगरपालिकेकडून रस्त्याचे कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे व संबंधित वाहतूक उपविभागाचे प्रभारी अधिकारी.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner